
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 DEC 2017
लोकमत

# जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात दीक्षांत समारंभ

## सुमित्रा महाजन, ए. एस. किरणकुमार यांच्यासाठी प्रयत्न

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ जानेवारी २०१८च्या दुसऱ्या आठवड्यात घेण्याच्या दृष्टीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाची तयारी सुरू आहे. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन आणि 'इस्रो'चे अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांच्या उपस्थितीसाठी विद्यापीठाकडून प्रयत्न सुरु आहेत.

या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी, पदविका प्रमाणपत्र मागणीसाठीचा अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया जुलै ते सप्टेंबर २०१७ दरम्यान राबविण्यात आली. याअंतर्गत विद्यापीठाकडे ५० हजार अर्ज दाखल झाले. संबंधित प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन राबविण्यात आली. संबंधित अर्जांमध्ये विद्यार्थ्यांनी भरलेली शैक्षणिक पात्रता, त्यांचे गुण, श्रेणी, छायाचित्रे आदी माहिती तपासणीचे काम सध्या सुरु आहे. त्यासह या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याबाबत लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन, इस्रोचे अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांना पत्राद्वारे आमंत्रण पाठविले आहे. त्यांच्या प्रतिसादानंतर पुढील कार्यवाही केली जाणार आहे. दीक्षान्त समारंभासह पदवी आणि पदविका प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेत वर्षागणिक माहिती व तंत्रज्ञानाचा वापर वाढविला जात आहे.

याअंतर्गत यंदा स्नातकांना दीक्षान्त समारंभाबाबतची माहिती, त्यांना समारंभादिवशी कोणत्या स्टॉलवरुन पदवी प्रमाणपत्र मिळणार या स्वरुपातील माहिती एसएमएस, ई-मेल आणि विद्यापीठाच्या संकेतस्थळाद्वारे देण्यात येणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 DEC 2017
पुढारी

# विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ नव्या वर्षात

## लोकसभा अध्यक्षांना आणण्यासाठी प्रयत्न



शिवाजी विद्यापीठातून...

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभाचे नियोजन सुरू आहे. जानेवारी २०१८ च्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात हा कार्यक्रम होईल या पद्धतीने नियोजन सुरू आहे. या कार्यक्रमासाठी लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन आणि इस्त्रोचे अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांना पाहुणे म्हणून आणण्यासाठी हालचाली सुरू आहेत. दीक्षांत समारंभ हा विद्यापीठाच्या वर्षभरातील कामकाजातील सर्वोच्च कार्यक्रम असतो.

स्नातकांना रितसर पदवी प्रमाणपत्र देण्याबरोबर पीएचडी मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते केला जातो. यंदाच्या दीक्षांत समारंभाची तयारी सुरू करण्यात आली आहे.